**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० **E.Mail- pilcbnskr@gmail.com**

---

**प्रेसनोट** दिनांक:- ०६/०२/२०१७

## जिल्हयात क्रॅक डाउन २०१८ विशेष मोहिम - अवैध धंदयावाल्यांचे धाबे दणाणले फरार आरोपींना पकडण्याचे विशेष मोहिमेत ४७ गुन्हेगार अटकेत

---

मा.पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी राज्यातील अवैध धंदयांचे समुळ उच्चाटन करणेसाठी क्रॅक डाउन-२०१८ ही मोहिम सुरू केली आहे. सदर मोहिमे दरम्यान नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांचे मार्गदर्शनाखाली अवैध धंदयांवर धडक कारवाई सुरु असुन अवैध धंदे चालकांचे धाबे दणाणले आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयात क्रॅक डाउन-२०१८ मोहिमे अंतर्गत अवैध धंदयावर सत्वर कारवाई करणेसाठी उपविभागीय स्तर तसेच पोलीस ठाणे निहाय पथके तयार करण्यात आली आहे. तसेच जिल्हयास्तरावर स्थानिक गुन्हे शाखा व विशेष पथकांव्दारे धडक कारवाई सुरू आहे. सदर मोहिमे दरम्यान जिल्हयातील अवैधरित्या मद्याची विक्री व वाहतुक करणारे, हातभट्टीची गावठी दारू तयार करणारे, अंक आकडे तसेच पत्त्यांवर पैसे लावुन अवैधरित्या मटका व जुगार खेळणारे व खेळविणारे इसमांविरूध्द धडक कारवाई करण्यात येत आहे. जिल्हयातील राष्ट्रीय तसेच राज्य महामार्गावरील हॉटेल-ढाबे, गावपातळीलवरील अवैधरित्या चालणारे दारूचे अड्डे, अवैधरित्या मद्याची वाहतुक करणारी वाहने, तसेच अतिदुर्गम भाग, डोंगर द-या, नदी नाले असलेल्या ठिकाणांवर गावठी दारूच्या हातभट्टया, तसेच मटका व जुगाराचे अवैध धंदे चालणारे ठिकाणांची गोपनीयरित्या माहिती घेवुन छापे टाकण्यात येत आहे. क्रॅक डाउन-२०१८ मोहिमे अंतर्गत जिल्हयातील पोलीस ठाणे निहाय अवैध धंदयावर करण्यात आलेल्या कारवाईत दारूबंदी कायदयान्वये एकुण ५७ गुन्हे दाखल करण्यात आले असुन सुमारे ०३ लाख ५० हजाराचा अवैध मद्यासाठा व हातभट्टीची गावठी दारू जप्त करण्यात आली आहे. तसेच जुगारबंदी कायदयान्वये एकुण १२ केसेस करण्यात आल्या असुन जुगाराचे साहित्य साधने व रोख रक्कम असा एकुण ०१ लाख ०८ हजार रू. किं.चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. जिल्हयातील अवैध धंदयांचे समुळ उच्चाटन होणेसाठी आगामी काळात अवैध धंदयांवर सतत कारवाई सुरु राहणार आहे. तसेच जिल्हयातील कुठल्याही पोलीस ठाणे हद्दीत अवैध धंदे सुरू असल्यास संबंधीत प्रभारी अधिकारी यांना जबाबदार धरून खुलासे घेण्यात येत आहे, त्यामुळे पोलीस ठाणे प्रभारी अधिका-यांना स्वत: खातरजमा करावी लागत आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस दलाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांचे वतीने नागरीकांना आवाहन करण्यात येते की, जिल्हयात कुठल्याही प्रकारचे अवैध धंदे आढळुन आल्यास नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस दलाचे **व्हॉटस् ॲप क्र. ९१६८५९११००**, व **नियंत्रण कक्ष दुरध्वनी क्र. ०२५३-२३०९७१५** या क्रमांकावर संपर्क करावा. तसेच जिल्हयाचे **फेसबुक पेज NASHIK RURAL POLICE**, व **ट्वीटर अकाऊंट NASHIK RURAL POLICE @SpRural** यावर माहिती देवुन पोलीसांशी संपर्क करावा.

तसेच नाशिक ग्रामीण जिल्हयात दि. ०१ फेब्रुवारी २०१८ पासुन गुन्हयांमधील फरार व पाहिजे असलेले आरोपींना पकडण्याची मोहिम राबविली जात आहे. नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो. यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे** जिल्हयातील पोलीस ठाणेनिहाय अभिलेखावर असलेले गुन्हयांमधील फरार व पाहिजे असलेले असलेले आरोपीतांना पकडण्यासाठी पोलीस ठाणे, उपविभाग तसेच जिल्हास्तरावर स्थानिक गुन्हे शाखा व विशेष पथके स्थापन करण्यात आली आहे. जिल्हयातील पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या विविध गुन्हयांमध्ये आरोपी निष्पन्न आहेत, परंतु गुन्हा घडल्यापासुन काही आरोपी हे फरार आहे. सदर आरोपीतांना पकडण्यासाठी राबविण्यात येणारे विशेष मोहिमेदरम्यान **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.अशोक करपे** व त्यांचे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी फरार आरोपींचे नातेवाईक, मित्र मंडळी, पोलीस मित्र व खब-यांच्या मदतीने माहिती मिळवुन ग्रामीण भाग तसेच विविध शहरातील गर्दीचे ठिकाणांवरून फरारी आरोपींचा मागमुस काढुन एकुण ४५ फरार आरोपींना जेरबंद केले असुन विशेष पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी ०२ आरोपींना ताब्यात घेतले आहे. सदर मोहिमेदरम्यान ग्रामीण पोलीसांना **एकुण ४७ फरार आरोपीतांना जेरबंद** करण्यात यश आले असुन त्यांना संबंधीत पोलीस ठाणेस दाखल असलेल्या गुन्हयांमध्ये अटक करण्यात आली आहे. गुन्हयातील फरार व पाहिजे असलेले आरोपीतांना ताब्यात घेणेसाठी आगामी काळात अशाच प्रकारे कारवाई सुरू राहणार आहे.